# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** ९३/२०२२ दि. २९/०३/२०२२

## गोळीबार करुन हत्या करणारे सराईत आरोपीतांना गुन्हे शाखे कडुन उत्तरप्रदेश येथे अटक.

विरार पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक २६/०२/२०२२ रोजी १३.२५ वा.चे सुमारास श्रीकृष्ण फर्निचर समोरील रोडवर, भाजीपाला मार्केटच्या बाहेर, ९० फीट रोड, मनवेलपाडा, विरार (पू), ता. वसई या ठिकाणी इसम नामे समरजित ऊर्फ समय विक्रमसिंह चौहाण रा. ठि.रुम नं. ए/१०१, अग्रवाल कॉम्प्लेक्स, गोकुळ हाईटस्चे बाजूला, डि मार्ट समोर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर हा त्याचे ऑफिसमधुन गाडीकडे जात असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांचेजवळ असलेल्या अग्नीशस्त्राने त्याचे डोक्यावर गोळीबार करुन दिवसाढवळया त्याचा निघृण खुन केल्याने विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं २३२/२०२२ भा.द.वि.स कलम ३०२, १२०(ब), भा.ह.का क ३, २५, २७ प्रमाणे अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरच्या गोळीबाराच्या घटनेने वसई विरार परीसरातील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने मा.वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नमुद खुनाचे गुन्हयाचा तपासासाठी गुन्हे शाखा कक्ष १, २, ३, मध्यवर्ती गुन्हे शाखा तसेच विरार पोलीस ठाणे मार्फत वेगवेगळया टिम तयार करण्यात आल्या.

सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून त्या ठिकाणी तात्रिंक बाबींचे विश्लेषण करण्यात आले. तसेच गोपनीय बातमीदारांकडुन ही माहीती मिळवण्याचा प्रयत्न करण्यात आला. सदर तपासा दरम्यान मिळालेल्या तांत्रिक दुव्यांवरुन सदरच्या गुन्हयातील आरोपीताची ओळख पटविण्यात मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांना यश आले. त्या अनुषंगाने मुंबई, ठाणे, वसई, विरार,मिरारोड या ठिकाणी गोपनीय बातमीदारांकडुन सदर आरोपीताबाबत माहीती प्राप्त करण्यात आली. विश्वसनीय बातमीदारांकडुन आरोपी हा उत्तरप्रदेश येथे पळून गेल्याची खात्रीलायक बातमी मिळाल्याने मा. श्री. डॉ. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे) हे स्वतः सोबत पोनि/प्रमोद बडाख, पोनि/ प्रफुल्ल वाघ व पथक हे उत्तरप्रदेश या ठिकाणी रवाना झाले. त्या ठिकाणी एस.टी.एफ. उत्तरप्रदेश यांचे यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच वाराणसी जिल्हयाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे सोबत समन्वय साधुन संयुक्तरित्या आरोपीतांचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली असता स्थानिक गोपणीय बातमीदाराव्दारे बातमी मिळवुन आज दिनांक २९/०३/२०२२ रोजी सकाळी चिताईपुर चौक, भिकारीपुर रोड वाराणसी उत्तरप्रदेश येथुन कुख्यात आरोपीत नामे १. राहुल विरेद्र शर्मा ऊर्फ राम, रा. बरवान, पो.स्ट, कटौना, ता. पिंडरा, जि. वाराणसी, राज्य उत्तर प्रदेश, २. अभिषेक तारकेश्वर सिह ऊर्फ अंकुर रा. लोहारडिह, पो.स्ट.कपसेठी, ता. पिंडरा, जि. वाराणसी. राज्य उत्तरप्रदेश. यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्याचेकडे विचारपुस

करता त्यांनी सदर गुन्हयाचे कबुली दिली देऊन सदर गुन्हयामध्ये त्यांचे सोबत मनीष सिह ऊर्फ सोनु तसेच आणखी एक आरोपीत असल्याची माहिती दिली आहे.

नमुद गुन्हयातील अटक आरोपीत नामे- राहुल विरेद्र शर्मा ऊर्फ राम याने सन २०१३ मध्ये निर्मल नगर पोलीस ठाणे मुंबई, येथे विजय पुजारी ऊर्फ बट्टा याची गोळी मारुन हत्या केली होती त्यावरुन त्याचेवर निर्मल नगर पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २२०/२०१३ भा.द.वी.सं.कलम ३०२,३२४,१४३ ,१४९,३७,२१२,१२० (ब), सह भा.ह.का. कलम ३,२५,२७ प्रमाणे व सन २०१३ मध्ये अजिल शेख याचा खुन करण्या-या उद्देशाने त्याचेवर अग्निशस्त्रातुन गोळया झाडुन हत्येचा प्रयत्न केल्याने निर्मल नगर पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १८४/२०१३ भा.द.वी.सं. कलम ३०७,३४, भा.ह.का. कलम ३,२५,२७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच सन २०१५ मध्ये मिरारोड पोलीस ठाणे पुष्पक हॉटेल समोर बंटी प्रधान यांची गोळी मारुन हत्या केल्याने मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २५३/२०१५ भा.द.वी.सं कलम ३०२, १२०(ब), भा.ह.का. कलम ३,२५,२७ प्रमाणे गुन्हे नोंद असुन वरिल तिन्ही गुन्हयामध्ये आरोपीत राहुल विरेद्र शर्मा ऊर्फ राम हा मागील ९ वर्षापासुन फरारी आहे.

वरील आरोपीत यांचे अटकेची कारवाई हि एस.टी.एफ. वाराणसी व गुन्हे शाखा मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय यांनी संयुक्तरित्या केली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. एस. जयकुमार, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. डॉ. महेश पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ -३, श्री. प्रशांत वाघुंडे, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. अमोल मांडवे, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. रामचंद्र देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि/ वराडे, पो.नि/ दिलीप राख नेम - विरार पोलीस ठाणे गुन्हे शाखेचे पो.नि/ प्रमोद बडाख, पो.नि/ प्रफुल्ल वाघ नेम - विरार पोलीस ठाणे, पो.नि/ अविराज कुराडे, पो.नि/शाहुराज रणवरे, पो.नि/ राहुल राख, पो.नि/ सुजित गुंजकर, सपोनि/ रंजितसिह परदेशी, सपोनि/ कैलास टोकले, सपोनि/ सुहास कांबळे, सपोनि/ जगताप, सपोनि/ आंबवणे, सपोनि/ सरक, सपोनि/ सुर्वे, सपोनि/ सोनवणे, सपोनि/ भगत,सपोनि/ बेंद्रे, सपोनि/ बुराडे, पोउपनिरी/ हितेंद्रे विचारे, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोउपनिरी/ संदेश राणे, पोउपनिरी/ अभिजित टेलर तसेच गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी उत्कृष्ट रित्या पार पाडली आहे.